## ग्राहकाभिमुख जाहिरातींसाठी रतनलाल सी.बाफना ज्वेलर्स ग्राहक दृष्टी "ग्राहक राजा" पुरस्काराने सन्मानित




व्यवसाय आणि जाहिरात कला यांचा अगदी जवळचा संबंध आहे. नवा उद्योग सुरू करणाऱ्याला अधिकाधिक ग्राहकांपर्यंत आपली आणि उत्पादनाची माहिती पोहोचवण्यासाठी जाहिरात गरजेची असते, तसचे बड्या, सुस्थापित ब्रँडनाही आपले महत्त्व ग्राहकांच्या मनावर वारंवार ठसवण्यासाठी जाहिरातीचाच आधार असतोच. वर्तमानपत्राच्या भाषेत म्हणतात की 'एक प्रभावी छायाचित्र शंभर शब्दांचे काम वाचवते.' तसेच व्यवसाच्या भाषेत बोलायचे झाल्यास 'एक कल्पक जाहिरात लाखो ग्राहकांच काम वाचवते.'

जाहिरात लोकप्रिय होण्यासाठी प्रत्येक वेळी ती खर्चीकच असावी लागते, असे नाही. कल्पकतेने केलेली साधी जाहिरातही लोकप्रिय होऊ शकते, आणि रतनलाल सी बाफना ज्वेलर्सने हेच हेरलं व गेल्या वर्षभरात ग्राहक हिताच्या जाहिराती सर्व माध्यमातुन केल्यात. त्यातील कल्पकता व मजकुरातील वास्तवता यावर ग्राहकदृष्टी पडली नी रतनलाल सी बाफना ज्वेलर्स इतक्या व्यवसाय विस्तारानंतरही कल्पक जाहिरातींच्या माध्यमातुन ग्राहक जपुन असल्याने ग्राहक दृष्टी ग्राहक राजा पुरस्काराचे मानकरी ठरले. आजच्या धकाधकीच्या जीवनात आपल्या ग्राहकांना पॉलीसीच्या माध्यमातुन सुरक्षा असो किंवा अगदी जिल्ह्यातील ग्रामिण भागात जाऊन दागिन्यांच्या प्रदर्शनाचं आयोजन असो. शहरात सुवर्णालंकारांची वाढते दालन पाहता कुठलीही आक्रमकता न करता ग्राहक हिताच्या रतनलाल सी बाफना ज्वेलर्सच्या जाहिराती सर्वांना भावल्या. जिल्हा नियोजन सभागृह, जळगांव येथे नुकताच पार पडलेल्या ग्राहक दृष्टी ग्राहक राजा पुरस्कार रतनलाल सी बाफना ज्वेलर्स चे जनसंपर्क अधिकारी मनोहर पाटील यांना संतोष मंडलेचा, अध्यक्ष महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स अँन्ड इंड्रस्ट्रीज, नाशिक व मनोहर सकपाल कार्यकारी संचालक, भागिरथी ट्रॅव्हल्स, मुंबई यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.